आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – दुपारी ३ वाजता

४ ऑक्टोबर २०२३ – बुधवार

राज्यातल्या ११ जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची सुधारीत यादी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज जाहीर केली. सुधारित यादीनुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे जिल्ह्याचं पालकमंत्रीपद देण्यात आलं आहे. अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे- पाटील असतील तर सोलापूर आणि अमरावती जिल्ह्यांचं पालकमंत्रीपद चंद्रकांत पाटील यांच्याकडे सोपवण्यात आलं आहे.

भंडाऱ्याचे पालकमंत्री विजयकुमार गावित, तर बुलढाण्याचे पालकमंत्री दिलीप वळसे-पाटील असतील. हसन मुश्रीफ यांच्याकडे कोल्हापूर, तर धर्मराव बाबा आत्राम यांच्याकडे गोंदिया जिल्ह्याची जबाबदारी आली आहे. बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे,तर परभणीचे संजय बनसोडे असतील. अनिल पाटील यांच्याकडे नंदुरबार जिल्हा तर सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे वर्धा जिल्हा पालकमंत्रीपद देण्यात आलं आहे.

**<><><><><><>**

रिझर्व बँकेच्या वित्त आणि पतधोरण आढावा समितीची बैठक आज मुंबईत सुरु झाली. या वर्षीचा द्वैवार्षिक वित्त आणि पत धोरण आढावा रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास येत्या शुक्रवारी सकाळी १० वाजता जाहीर करतील, आणि नंतर पत्रकारपरिषद घेतील. गेल्या आढाव्यात व्याजदरांमधे कोणताही बदल रिझर्व बँकेनं केला नव्हता.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या दुपारी मध्य प्रदेशातल्या जबलपूरला भेट देणार आहेत. यावेळी ते रस्ते, रेल्वे, गॅस पाईपलाईन, गृहनिर्माण आणि शुद्ध पिण्याचं पाणी यासारख्या क्षेत्रातल्या सुमारे १२ हजार ६०० कोटी रुपयांपेक्षा अधिक किंमतीच्या राष्ट्र विकास प्रकल्पांचं लोकार्पण करतील. मुंबई- नागपूर- झारसुगुडा या ३१७ किलोमीटर लांबीच्या पाईपलाईन प्रकल्पाच्या नागपूर- जबलपूर विभागाची पायाभरणीही मोदी यावेळी करणार आहेत. या प्रकल्पावर सुमारे अकराशे कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या राजस्थानच्या दौऱ्यावरही जाणार असून ते जोधपूरला भेट देणार आहेत. सुमारे पाच हजार कोटी रुपयांच्या अनेक विकास प्रकल्पांची ते पायाभरणी करतील तसंच अनेक प्रकल्पांचं लोकार्पण करतील.

<><><><><><>

मुंबई विद्यापीठात परीक्षेचं नियोजन करून निकाल वेळेत जाहीर करण्याबाबत कालबद्ध पद्धतीनं नियोजन करावं, यासाठी खासगी कंपन्यांची मदत लागली, तर त्या बाबतही आराखडा तयार करावा आणि वेळेत परीक्षेचे निकाल जाहीर करावेत, असं उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी म्हटलं आहे. मुंबई विद्यापीठाच्या विविध अडचणी आणि कामकाजाचा त्यांनी आज आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते.

<><><><><><>

चीन मधे हाँगझू इथं सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत आज ज्योती सुरेखा वेण्णम आणि ओजस देवतळेने तिरंदाजीत कंपाऊंड मिश्र प्रकारात सुवर्णपदक मिळवलं. रिपब्लिक ऑफ कोरियाच्या जोडीचा त्यांनी १५९-१५८ असा पराभव केला. चालण्याच्या शर्यतीत रामबाबू आणि मंजूराणी यांनी मिश्र

रिलेमधे कांस्य पदक मिळवलं तर स्क्वॅशमधे दीपिका पल्लीकल आणि हरिंदर पाल सिंग यांनी हाँगकाँगच्या जोडीचा पराभव करुन अंतिम फेरीत प्रवेश केला. बॅडमिंटनमधे पी व्ही सिंधू आणि एच एस प्रणॉय या दोघांनी एकेरीतले आपापले सामने जिंकून उपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. नीरज चोप्रा, अविनाश साबळे आणि लवलीना बोर्गोनहोन आज आपापल्या क्रीडाप्रकारातले पुढचे सामने खेळतील. हॉकी च्या उपांत्य फेरीत भारताच्या पुरुष संघाचा सामना आज कोरियाबरोबर होणार आहे.

<><><><><><><>

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी दाखवलेल्या चमकदार कामगिरीबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे. आशियाई खेळांमध्ये भारतानं या अगोदरपेक्षा खूपच चांगली कामगिरी केल्याची भावना त्यांनी समाजमाध्यमावर व्यक्त केली आहे.

<><><><><><><>

'आयसीसी -विश्वचषक एकदिवसीय क्रिकेट स्पर्धा' उद्यापासून भारतात सुरु होत आहे. याआधी यजमानपदी असताना भारतानं २०११ मध्ये विश्वचषक जिंकला होता. कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली यंदाही भारतीय संघ उत्तम कामगिरी करेल, असा विश्वास क्रिकेट विश्लेषकांनी व्यक्त केला आहे. उद्या दुपारी इंग्लड - न्यूझीलंड संघांमध्ये पहिला सामना खेळला जाणार आहे.

<><><><><><><>

गोवा इथं झालेल्या पश्चिम भारत विभाग भारोत्तोलन स्पर्धेत ६९ किलो वजनी गटात भंडारा जिल्ह्याच्या सिद्धी मदनकरनं सुवर्ण पदक पटकावलं. या

स्पर्धेत देशातल्या सात राज्यातल्या महिला खेडाळूंनी सहभाग घेतला होता. सिद्धीने विदर्भ संघाकडून खेळत हे यश मिळवलं.

<><><><><><>

पश्चिम रेल्वेची उपनगरी गाडी आज सकाळी साडे अकराच्या सुमाराला रुळावरुन घसरल्यानं उपनगरीय वाहतूक मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली, त्यामुळे प्रवाशांची मोठीच गैरसोय झाली.ही रिकामी रेल्वेगाडी कारशेड मध्ये जात होती.रुळ बदलण्याच्या ठिकाणी  गाडीचा एक डबा घसरला त्यामुळे पश्चिम रेल्वेचं वेळापत्रक बिघडलं.

//<><><><><><><>//